# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- २९/०६/२०२२

## <u>मा. विशेष महासभा</u>

**मा. महासभा सुचना क्र. ०२**

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ------------------------------------
नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगपालिकेची मा. विशेष महासभा सोमवार दि. ११/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०२ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. विशेष महासभा सोमवार दि. ११/०७/२०२२, सभा सुचना क्र. ०२ विषयपत्रिका**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| १९ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २५ (६) अन्वये निवृत्त होणाऱ्या परिवहन समितीच्या खालील सहा सदस्यांच्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २५ (२) (३) नुसार अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींमधून, महानगरपालिकेने नवीन सहा सदस्यांची नेमणूक करणे.<br>निवृत्त सदस्यांची नावे :-<br>१) श्री. टॉमस अंतोन ग्रेसीयस, २) श्री. दिलीप रुपचंद जैन, ३) श्री. अविनाश अरविंद जागुष्टे, ४) श्रीम. वनिता शंकर बने, ५) श्री. देविप्रसाद जगन्नाथ उपाध्याय व ६) श्री. राजेश हरिश्चंद्र म्हात्रे |

महानगरपालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- २९ जुन २०२२

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत :- निवडणूक कार्यक्रम.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगरसचिव विभाग

**परिवहन समितीच्या रिक्त झालेल्या सहा (6) सदस्य पदांच्या जागा भरणेसाठी निवडणुक कार्यक्रम**

| वार व दिनांक | वेळ | तपशिल |
|---|---|---|
| बुधवार दि. 06/07/2022 | सकाळी 11.00 ते दुपारी 01.00 वाजेपर्यंत | परिवहन समितीच्या सहा (6) सदस्य पदाचे निवडणुकीकरिता विहित नमुन्यातील नामनिर्देशन पत्र महानगरपालिका सचिव यांचेकडे त्यांच्या कार्यालयांत दाखल करणे. |
| | दुपारी 03.30 वाजता | प्राप्त नामनिर्देशन पत्रांची यादी प्रसिध्द करणे. |
| गुरुवार दि. 07/07/2022 | सकाळी 11.00 वाजता | दाखल झालेल्या नामनिर्देशन पत्रांची छाननी महापालिका सचिव यांचे कार्यालयात करणे. |
| | छाननी पूर्ण झाल्यानंतर लगेच | वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे. |
| शुक्रवार दि. 08/07/2022 | सकाळी 11.00 ते दुपारी 01.00 वाजेपर्यंत | उमेदवारी मागे घेणे. |
| | दुपारी 01.30 वाजता | निवडणुक लढविणाऱ्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिध्द करणे. |
| सोमवार दि. 11/07/2022 | सकाळी 11.00 वाजेपासून पुढे सभेचे कामकाज संपेपर्यंत | महापालिका महासभेत परिवहन समितीच्या सहा (6) सदस्यांच्या पदांसाठी निवडणुकीची आवश्यकता भासल्यास मतदान घेण्यांत येईल व मतदान संपताच मतमोजणीस प्रारंभ होईल. |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 25 (2) मधील अर्हता व 25 (3) मधील अनर्हता लक्षात घेऊन नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यांत येणार आहे. तरी नामनिर्देशन पत्रासोबत आवश्यक ती प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे. अन्यथा नामनिर्देशन पत्र फेटाळले जाईल याची सुचक, अनुमोदक व उमेदवार यांनी कृपया नोंद घ्यावी.

1) विहीत नमुन्यातील नामनिर्देशन पत्र गुरुवार दि. 30/06/2022 ते मंगळवार दि. 05/07/2022 पर्यंत कार्यालयीन कामाचे दिवशी सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यंत महापालिका सचिव कार्यालयात उपलब्ध होतील.
2) नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या वेळी सुचक, अनुमोदक व उमेदवार यांनी समक्ष हजर राहणे आवश्यक आहे. त्यांचे समक्ष नामनिर्देशन पत्र दाखल करुन घेणेंत येईल. तसेच नामनिर्देशन पत्र छाननीच्या दिवशी व वेळी सूचक, अनुमोदक व उमेदवार यांनी समक्ष हजर रहावे.
3) उमेदवाराचे संपूर्ण नाव, निवासाचा पत्ता, विधानसभा क्रमांक, विधानसभा अद्यावत मतदार यादी भाग क्रमांक व अनुक्रमांकाची प्रमाणित प्रत सोबत जोडावी.
4) उमेदवार हा मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मतदार असावा.
5) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 25(2) नुसार परिवहन सदस्यांसाठी ज्या व्यक्तीला प्रशासनाचा किंवा परिवहनाचा अनुभव असेल व अभियांत्रिकी, औद्योगिक, वाणिज्यिक, वित्तीय किंवा कामगार विषयक बाबतीत ज्यांची क्षमता दिसून आली असेल याबाबतची प्रमाणित कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.
6) पालिका सदस्य म्हणून अर्हता धारण करणेसाठी आवश्यक असलेली प्रतिज्ञापत्रे नामनिर्देशन पत्रासोबत जोडणे आवश्यक आहे.

महापालिका सचिव कार्यालय
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- 29/06/2022

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका